**नि.फौ.ख.क्रं.७८/२०२३**
**सरकार वि. दिनेश वगैरे**
**नि.क्र. १७**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी.**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | यादव महादेव मेंढे, |
| वय सुमारे | : | ५५ वर्ष, व्यवसाय–शेती |
| निवासस्थान | : | भेंडाळा, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास – सहा. सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत–**

**१.** घटना दिनांक ०४/०१/२०२३ रोजी घडली होती. घटना माझ्या घराच्या अंगणात सकाळी ०७:०० वाजेच्या दरम्यान घडली होती. मणीराम मेंढे यांनी आमच्या जाणेयेण्याच्या रस्त्यावर माती टाकली होती. पाऊस पडल्यामुळे तिथे चिखल झाला होता. त्यानंतर कोर्टाच्या आदेशानुसार आम्ही ती माती काढुन टाकली होती. घटनेच्या दिवशी पहाटे पाऊस आला आणि रस्त्यावर चिखल तयार झाला. घटनेच्या दिवशी मणीराम मेंढे मला आणि माझ्या पत्नीला शिवीगाळ करत होते. त्यानंतर माझी पत्नी घराच्या बाहेर निघाली आणि आम्हाला शिवीगाळ का करत आहात असे मणीराम मेंढे याला म्हणाली. तरीपण मणीरामची शिवीगाळ सुरूच होती. त्यानंतर दिनेश मणीराम मेंढे याने त्याच्या घरातून एक लाकडी काठी आणली आणि माझ्या पत्नीच्या डोक्यावर डाव्या बाजूला मारली. त्यानंतर माझी पत्नी ओरडली. तिचा आवाज ऐकून मी घटनास्थळी धावत गेलो. त्यानंतर सिमा दिनेश मेंढे ही सुध्दा घटनास्थळी आली. त्यानंतर तिन्ही आरोपींनी मला आणि माझ्या पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर माझी पत्नी बेशुध्द पडली. त्यानंतर काही लोकांनी भांडण सोडविले. त्यानंतर मी माझ्या पत्नीला घेऊन पोलीस स्टेशन पवनी येथे गेलो. पोलीसांनी मला माझ्या पत्नीला दवाखान्यात घेऊन जाण्यास सांगितले. त्यानंतर मी माझ्या पत्नीला पवनी येथील सरकारी दवाखान्यात घेऊन गेलो. पवनी येथील दवाखान्यात असलेल्या डॉक्टरांनी माझ्या पत्नीवर प्राथमिक उपचार केले होते. डॉक्टरांनी मला माझ्या पत्नीला भंडार येथील दवाखान्यात घेऊन जाण्यास सांगितले होते. त्यानंतर मी माझ्या पत्नीला भंडारा येथील दवाखान्यात घेऊन गेलो. त्यानंतर सायंकाळी मी पोलीस स्टेशन पवनी येथे आरोपीविरुध्द तक्रार देण्यास गेलो. आता मला ती तक्रार दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक १८** देण्यात येते. आता मला प्रथम छापील खबर अहवाल दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर

आहे. त्यास **निशाणी क्रमांक १९** देण्यात येते. दिनेश मेंढे याने माझ्या पत्नीला ज्या काठीने मारहाण केली होती ती मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला जप्त मुद्देमाल क्रमांक २०/२०२३ वरील बासाची लाकडी काठी दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येते. आरोपींना मी ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे वकील के. एम. जिभकाटे साहेब यांच्यामार्फत –</u>**

२. माझे घर आरोपींच्या घराजवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे जनावरे आहेत. आरोपींचे आणि माझे घर समोरासमोर नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या मागच्या बाजुला गोठा आहे. माझे दोन घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या राहत्या घराच्या मागच्या बाजुला मी जनावरे बांधतो. हे म्हणणे खरे नाही की, जनावरांचे मलमूत्र माझ्या घराच्या अंगणातून वाहत येते. हे म्हणणे खरे नाही की, जनावरांच्या मलमुत्रामुळे जंतू तयार झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, जनावरांच्या मलमुत्राचा त्रास होऊ नये म्हणुन आरोपींनी त्यांच्या घराच्या अंगणात माती आणि मुरूम टाकले होते. हे म्हणणे खरे आहे की, भरण टाकले या कारणावरून आरोपी आणि माझ्यात आधी वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरातील भरण मी मुजोरीने जेसीबीच्या सहाय्याने बाहेर फेकले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचा आणि माझा जाणेयेण्याचा रस्ता पूर्वीपासूनच बैलबंडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी एकदा मुजोरीने माझ्या ट्रॅक्टरला कॅशबील लावून आरोपींच्या घराला घासून ट्रॅक्टर घेऊन गेलो होतो. आरोपींचा आणि माझा जाणेयेण्याचा रस्ता भिंतीपासून अंदाजे १० ते ११ फुट आहे. दोन्ही घरांची वरणी सोडून रस्ता ७ ते ८ फुट एवढा आहे. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॅक्टर नेण्याच्या कारणावरून आरोपी आणि माझ्यात भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपींच्या घराच्या अंगणात भरपूर पाणी साचले होते. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावर असलेले पावसाचे पाणी ग्रामपंचायतने बांधलेल्या नालीतून जाते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी नाली बंद होती. हे म्हणणे खरे नाही की, पावसाचे पाणी निघाले पाहिजे म्हणुन घटनेच्यावेळी दिनेश मेंढे नालीला एका बाजूला छिद्र पाडत होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनेशला छिद्र पाडताना पाहून मी आणि माझी पत्नी तिथे गेलो आणि त्याला म्हणालो की, नालीला मधून छिद्र पाड, एका बाजून पाडू नको. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनेशसोबत नालीला छिद्र करण्याच्या कारणावरून लांबाझोंबी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी पत्नी दिनेशच्या अंगावर धावून जाताना पाय घसरून सिमेंटच्या नालीवर पडली आणि त्यामुळे तिच्या डोक्याला इजा झाली. हे म्हणणे खरे नाही की, पावसाचे पाणी पूर्वीपासूनच दिनेश छिद्र पाडत असलेल्या जागेवरुन जात होते.

३. तोंडी रिपोर्ट देतेवेळी मी पोलीसांना सांगितले होते की, कोर्टाच्या आदेशानुसार आम्ही ती माती काढुन टाकली होती, त्यानंतर माझी पत्नी ओरडली, तिचा आवाज ऐकून मी घटनास्थळी धावत गेलो. आता मला माझे तोंडी रिपोर्ट वाचून दाखवण्यात आला. सदर बाबी माझ्या तोंडी रिपोर्टमध्ये नमून नाहीत. ते पोलीसांनी का नमूद केले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, दिनेश नी माझ्या पत्नीच्या डोक्यावर काठी मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिमा मेंढे घटनास्थळी आल्याचे आणि आरोपींनी मला आणि माझ्या पत्नीला मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल 'अ' वर असलेल्या लाकडी काठीने माझ्या पत्नीला मारहाण झाल्याचे मी खोटे सांगत आहे.

५. माझ्याकडे शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातील लोकं पावसाळ्यात त्यांच्या शेतात जाण्याकरीता सोबत काठी घेऊन जात असतात. हे म्हणणे खरे आहे की, गावातील प्रत्येक शेतक–याच्या घरी लाकडी काठी असते. हे म्हणणे खरे नाही की, मी आर्टिकल 'अ' वरील काठी पोलीसांना दिली. आर्टिकल 'अ' वरील काठीची लांबी रुंदी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुन्या वादावरून मी आरोपींविरुध्द खोटी तक्रार दाखल केली. माझे बयान पोलीसांनी माझ्या घरी नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही**.

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/– | स्वा/– |
| **(व्ही. आर. फरकुंडे)** | **(व्ही. आर. फरकुंडे)** |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२), | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२) |
| पवनी. | पवनी. |
| ३१/१०/२०२५ | ३१/१०/२०२५ |

नि.फौ.ख.क्रं.७८/२०२३
सरकार वि. दिनेश वगैरे
नि.क्र. २०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी.**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | मोहनदास देवराम बोरकर, |
| वय सुमारे | : | ४५ वर्ष, व्यवसाय–शेती |
| निवासस्थान | : | भेंडाळा, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास – सहा. सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत–**

१. पोलीसांनी लेखी सूचनापत्र देऊन मला पंचनाम्याकरीता बोलावले होते. आता मला ते सूचनापत्र दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक २१** देण्यात येते. मी घटनास्थळी गेलो होतो. पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक २२** देण्यात येते. पोलीसांनी माझ्यासमक्ष एक लाकडी बासाची काठी जप्त केली होती. पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा केला होता. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक २३** देण्यात येते. जप्त केलेली काठी मला दाखवल्यास मी ती ओळखू शकतो. आता मला आर्टिकल अ वरील काठी दाखवण्यात आली. ती तीच आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास आरोपीतर्फे वकील के. एम. जिभकाटे साहेब यांच्यामार्फत –**

२. मी फिर्यादीच्या शेतात मजुर म्हणुन काम करतो. फिर्यादीच्या घरी माझे रोजचे जाणेयेणे असते. हे म्हणणे खरे आहे की, गावातील सिमेंट रोडाच्या उंचीपेक्षा फिर्यादीच्या घराच्या अंगणाची उंची कमी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिमेंट रोडची उंची जास्त असल्यामुळे फिर्यादी आणि आरोपींच्या घराचे पाणी रोडवरून निघत नाही. हे मला माहित नाही की, फिर्यादीने त्याच्या घराचे पाणी निघण्याकरीता अंडरग्राउंड पाईप टाकला आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुचनापत्र, घटनास्थळ आणि जप्ती पंचनाम्यावर माझया सहया पोलीसांनी एकाचवेळी घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला घटनास्थळ

आणि जप्ती पंचनामे वाचुन दाखवले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ आणि जप्ती पंचनामेमध्ये काय लिहीले आहे हे आज रोजी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष काठी जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही**.

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),
पवनी.
३१/१०/२०२५

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२)
पवनी.
३१/१०/२०२५